# <u>उमेदवारांना समुपदेशन प्रक्रियेबाबत सुचना</u>

1. पदसथापना व नियुक्ती आदेश देण्याकरीता समुपदेशन प्रक्रिया दिनांक ०७ नोव्हेंबर, २०१७ रोजी सकाळी ठिक ०९:०० वाजता सुरु होईल. सर्व उमेदवारांनी समुपदेशनाचे ठिकाणी स्थापित केलेल्या नोंदणी कक्षात सकाळी ०९:०० वाजता उपस्थित राहणे आवश्यक आहे.
2. जे उमेदवार सकाळी ०९:०० नंतर हजर होतील त्यांची नोंदणी सर्वात शेवटी करण्यात येईल व वेळेत हजर झालेल्या व नोंदणी केलेल्या उमेदवारांचे समुपदेशन पुर्ण झाल्यावरच समुपदेशनासाठी बोलविण्यात येईल.
3. समुपदेशनाच्या दिवशी जे उमेदवार पुर्वपरवानगी न घेता अनुपस्थीत राहतील त्यांचा नियुक्तीकरीता विचार करण्यात येणार नाही.
4. नोंदणी प्रक्रिया पुर्ण झाल्यावर सर्व उपस्थित उमेदवारांच्या मुळ प्रमाणपत्रांची तपासणी करण्यात येईल याकरीता सर्व मुळ प्रमाणपत्रे व त्याची एक एक स्वसाक्षांकीत प्रत तयार ठेवावी. सदर तपासणी १०:०० पासून सुरु करण्यात येईल.
5. मुळ प्रमाणपत्र नसल्यास किंवा अपुरी प्रमाणपत्रे असल्यास अशा उमेदवारांच्या प्रमाणपत्रांची तसापणी केली जाणार नाही. अशा उमेदवारांना कोणतीही मुदत देण्यात येणार नाही.
6. प्रमाणपत्रांची तपासणी पुर्ण झाल्यावर सर्व उपस्थित उमेदवारांना सभागृहामध्ये समुपदेशन व नियुक्ती प्रक्रियेची माहिती देण्यात येईल. उमेदवारांनी सदर प्रक्रिया काळजीपुर्वक समजावून घ्यावी व काही शंका असल्यास त्याचे निरसन तेथेच करुन घ्यावे.
7. निवडीसाठी पात्र उमेदवारांची संवर्गनिहाय अंतर्गत जेष्ठता सुचीनूसार समुपदेशनासाठी बोलावण्यात येईल.
8. समुपदेशनास जाण्यापुर्वी उमेदवाराने सभागृहात व सुचना फलकावर त्याच्या संवर्गातील रिक्त पदांची माहिती काळजीपुर्वक पहावी व शिल्लक पदांमधून त्याच्या पसंतीची २ ते ३ ठिकाणे निवडावीत.
9. समुपदेशन समितीकडे परिशिष्ट अ मधील समुपदेशन नमुना सादर करावा व उमेदवाराने निवडलेल्या २ ते ३ ठिकाणांमधून एक ठिकाण अंतिम करावे.
10. उमेदवाराने नियुक्तीसाठी अंतिम ठिकाण निश्चित केल्यावर त्याची नोंद सर्व रिक्त जागांच्या तक्त्यांमध्ये करण्यात येईल त्यामुळे रिक्त पदांमध्ये बदल होत राहील याची उमेदवरांनी नोंद घ्यावी व त्यानूसार पसंतीक्रमामध्ये सुधारणा करावी.
11. उमेदवाराने पसंतीचे नियुक्तीचे ठिकाण निश्चित केल्यावर त्याची नोंद समुपदेशन नमुन्यात घेण्यात येईल व त्यावर उमेदवार व समिती सदस्य स्वाक्षरी करतील. यानंतर उमेदवाराने निवडलेल्या ठिकाणामध्ये कोणत्याही परिस्थितीत बदल केला जाणार नाही.

12. उमेदवाराने व समुपदेशन समितीने पदस्थापनेचे ठिकाण निश्चित केल्यानंतर उमेदवाराचे नियुक्ती आदेश तयार करण्यात येतील.
13. उमेदवाराने सदर नियुक्ती आदेश तपासून त्यात नमूद आपले नाव, प्रवर्ग, पदाचे नाव, पदस्थापनेचे ठिकाण इत्यादी तपशिल बरोबर आहे याची खात्री करुन घ्यावी व नियुक्ती आदेश मिळाल्याची पोहोच पावती द्यावी.
14. उमेदवारास नियुक्ती प्रक्रियेबाबत काही आक्षेप असल्यास त्यांनी तात्काळ समुपदेशन समितीस सुचित करावेत. सदर उमेदवाराचे समुपदेशन पुर्ण झाल्यानंतर कोणताही आक्षेप स्विकारल्या जाणार नाही.
15. समुपदेशनाचे ठिकाण पुढीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | कार्यालयाचे नाव | पत्ता |
|---|---|---|
| १ | आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई | आरोग्य सेवा संचालनालय, आरोग्य भवन, ५ वा मजला, सेंट जार्जेस रुग्णालय आवार, पी. डीमेलो मार्ग, सीएसटी, मुंबई<br>दूरध्वनी ०२२ २२६५०७१० |
| २ | सहसंचालक, आरोग्य सेवा, (हिवताप, हत्तीरोग व जलजन्यरोग), पुणे १ | सहसंचालक, आरोग्य सेवा, (हिवताप, हत्तीरोग व जलजन्यरोग), पुणे १ यांचे कार्यालय, नवीन मध्यवर्ती इमारत, पहिला मजल, (New Central Building, 1st Floor) पुणे १<br>दूरध्वनी ०२० २६१२४२९९ |
| ३ | उपसंचालक, आरोग्य सेवा, अकोला | उपसंचालक, आरोग्य सेवा, अकोला यांचे कार्यालय, जिल्हा स्त्री रुग्णालय, दुर्गा चौक, अकोला<br>दूरध्वनी ०७२४ २४१०७६४ |
| ४ | उपसंचालक, आरोग्य सेवा, औरंगाबाद | उपसंचालक, आरोग्य सेवा, औरंगाबाद यांचे कार्यालय, बाबा पेट्रोलपंप, महावीर चौक, औरंगाबाद<br>दूरध्वनी ०२४० २३३१३५७ |
| ५ | उपसंचालक, आरोग्य सेवा, नाशिक | उपसंचालक, आरोग्य सेवा, नाशिक यांचे कार्यालय, जिल्हा रूग्णालय नाशिक आवार, नाशिक<br>दूरध्वनी ०२५३ २५९२२७१/७२ |
| ६ | उपसंचालक, आरोग्य सेवा, लातुर | उपसंचालक, आरोग्य सेवा, लातूर यांचे कार्यालय, आरोग्य संकुल, नवीन जिल्हाधिकारी कार्यालयाजवळ, बार्शी रोड, लातूर<br>दूरध्वनी ०२३८ २२२०३११/१२ |